# दि विटा मर्चंटस् को-ऑप. बँक लि; विटा (जि. सांगली)


प्रधान कार्यालय - यशवंतनगर, साळशिंगे रोड, विटा - ४१५ ३११ (जि. सांगली)

फोन : (०२३४७) २७३३१३, २७३३१४ व 7588564791 Email: info@vitamerchantsbank.com


## -: वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस :-

(फक्त सभासदांसाठी)

दि विटा मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटा ची ८८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २८/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता **जय मल्टीपर्पज हॉल, मायणी रोड, विटा** येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी बोलाविणेत आली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेपुढील विषयसूची

०१. दिनांक २४/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

०२. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२३-२४ या वर्षाच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.

०३. सन २०२३-२४ सालाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी झालेल्या खर्चाची नोंद घेऊन जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२४-२५ सालाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

०४. मा. सनदी हिशोब तपासनीस (Statutory Auditor) यांचेकडून आलेल्या सन २०२३-२४ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची व पत्रकाची नोंद घेणे.

०५. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

०६. रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे सन २०२४-२०२५ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीचा प्रस्तावास रिझर्व्ह बँकेकडून मान्यता आलेली आहे. याची नोंद घेऊन त्यासंदर्भात मा. संचालक मंडळास अधिकार प्रदान करणे.

०७. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कर्जाची नोंद घेणे.

०८. सन २०२३-२४ या कालावधीत घेतलेल्या बाहेरील कर्जाची संस्थेने केलेल्या परतफेडीची नोंद घेणे व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे.

०९. एक रकमी कर्ज परतफेड योजना तसेच बँकेच्या कॉम्प्रमाईज सेटलमेंट धोरणानुसार केलेल्या कामकाजास कार्योत्तर मंजुरी देणे व संचालक मंडळाने ज्या थकबाकीदार सभासदांना त्यांचेकडील थकबाकी वसुलीत व्याज, दंडव्याज, व खर्चात दिलेल्या सूट रकमेची नोंद घेणे.

१०. निर्लेखन केलेल्या खात्यात झालेल्या वसुलीची नोंद घेणे.

११. सन २०२४-२५ मधील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमास मंजुरी देणे.

१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित (Condone) करणे.

१३. मा. संचालक मंडळाकडून आलेल्या अन्य कामकाजाचा विचार करणे.

१४. मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन

**जी. बी. जोशी**

मुख्य कार्यकारी अधिकारी

- स्थळ : विटा
- दिनांक : १३/०९/२०२४

---

**• सूचना :**

१) गणसंख्ये (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास ती अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी घेणेत येईल . या सभेस गणपूर्तीचे (कोरमचे) बंधन राहणार नाही.

२) सभासदांना विषयपत्रिकेतील नमूद केलेल्या विषयांच्या अनुषंगाने लेखी प्रश्न विचारावयाचे असल्यास दि. २१/०९/२०२४ पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत प्रधान कार्यालयात देणे आवश्यक आहे.

३) बँकेच्या पोटनियम क्र.३४ डी मधील तरतुदीनुसार संचालक मंडळाच्या अहवालासह ताळेबंद, नफा-तोटा पत्रक बँकेच्या मुख्य कार्यालयात व बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

४) बँकेच्या website:www.vitamerchantsbank.com वर नोटीस, संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक प्रसिध्द केले आहे.

**• विशेष सूचना :**

१) प्रत्येक सभासदाने कमीत कमी भाग भांडवल रू. २,५००/- चे खरेदी करणे आवश्यक असून सदर सभासद मतदानास पात्र राहतील.

२) नवीन सहकार कायद्यातील तरतुदीनुसार सर्व सभासदांसाठी याच दिवशी याच ठिकाणी सकाळी ठीक १०.०० वा. प्रशिक्षण वर्ग आयोजित केला आहे. त्यास सर्वांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

३) बँकेची SMS ALERT सेवा सुरू असून सर्व सभासदांनी / ग्राहकांनी मोबाईल नंबर नजिकच्या शाखेत कळवावेत ही विनंती.

४) रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशानुसार खातेदारांनी वेळोवेळी के.वाय.सी. ची पूर्तता करणे बंधनकारक आहे.